आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
११ ऑगस्ट २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ सुधारणा आणि केरळचे नाव केरळम करणाऱ्या विधेयकाला चर्चेशिवाय लोकसभेची मंजुरी

- वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा अवमान करणं हा गुन्हा ठरवणाऱ्या विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची स्वाक्षरी

- महाराष्ट्रात भूसंपादनाचा मोबदला उशिरा मिळाला तर जमीन मालकांना रेपो दरापेक्षा १ टक्के अधिक व्याज मिळणार

**आणि**

- कोलंबियात झालेल्या भूकंपात सुमारे पावणे २०० नागरिकांचा मृत्यू, हजारो लोक बेपत्ता

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात आतापर्यंत ११ पैकी ९ विधेयकं कुठल्याही चर्चेशिवाय मंजूर झाली. सहकारी संस्थांना कर्ज देण्यासाठी राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाला सक्षम करणाऱ्या विधेयकाला लोकसभेनं आज कुठल्याही चर्चेशिवाय मंजुरी दिली. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी लोकसभेत हे विधेयक मांडलं.

**होल्ड- मोहोळ बाइट**

केरळचे नाव केरळम करणारं विधेयकही कुठल्याही चर्चेशिवाय आज लोकसभेत मंजूर झालं. त्यानंतर लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

राज्यसभेत न्यायाधिकरण सुधारणा विधेयकाला संसदेची आज मंजुरी मिळाली. राज्यसभेत आज हे विधेयक मंजूर झालं. राष्ट्रीय न्यायाधिकरण

आयोगाची स्थापना आणि विविध न्यायाधिकरणाच्या कामकाजात सुसुत्रता आणणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. हे विधेयक मंजूर झाल्यावर दिवसभरासाठीचं कामकाज संपवून राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. यापूर्वी विविध मुद्द्यांवर राज्यसभेत गदारोळ झाला होता.

दरम्यान FCRA अर्थात परदेशी निधी नियमन सुधारणा विधेयक संसदेच्या संयुक्त समितीकडे पाठवण्याची सरकारची तयारी असल्याचं सुत्रांनी सांगितलं. उद्या लोकसभेत यासंदर्भातला प्रस्ताव मांडला जाऊ शकतो.

झारखंडमध्ये विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या कारवाईच्या मुद्द्यावरुन आज सकाळी संसदेच्या आवारात राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांनी मोर्चा काढला. नवी दिल्लीत विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलीस कारवाई प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा निवेदन द्यायला तयार असतानाही विरोधक संसदेचं कामकाज चालू देत नसल्याचा आरोप या खासदारांनी यावेळी केला. याविषयी संसदीय कार्य मंत्री किरेन रीजीजू म्हणाले

**होल्ड रिजिजू बाइट**

**<><><><><>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाची साप्ताहिक बैठक मंगल मिलन आज नवी दिल्लीच्या संसदभवन परिसरात झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, भाजपा अध्यक्ष नितिन नवीन यांच्या सह भाजपा आणि मित्रपक्षांचे खासदार बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचा अवमान करणं हा गुन्हा ठरवणाऱ्या विधेयकावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज स्वाक्षरी केली. या नव्या कायद्यानुसार वंदे मातरमचा अवमान करणाऱ्यांना ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही

ठोठावला जाऊ शकतो. तसंच वारंवार हाच गुन्हा करणाऱ्यांना प्रत्येक नव्या गुन्ह्यासाठी एका वर्षापर्यंत तुरुंगवासाची शिक्षा देता येऊ शकते.

**<><><><><>**

देशभरात ७ ऑगस्ट पर्यंत ९६७ लाख हेक्टर जमिनीवर खरिपाच्या पेरण्या पूर्ण झाल्याची माहिती कृषी मंत्रालयाने दिली आहे. त्यात ३४४ लाख हेक्टर जमिनीवर भात आणि १८० लाख हेक्टर क्षेत्र तेलबियांखाली असून गेल्यावर्षीपेक्षा यावर्षी हे क्षेत्र ५ लाख हेक्टरने वाढलं आहे. श्री अन्न अर्थात भरड धान्याखाली १६८ लाख हेक्टर जमीन असून १०६ हेक्टर क्षेत्रावर कापूस , तर १०३ लाख हेक्टर क्षेत्रात कडधान्यांची लागवड झाली आहे. उसाखाली ५८ लाख हेक्टर तर तागाची लागवड ६ लाख हेक्टर क्षेत्रात आहे.

**<><><><><>**

राज्यात भूसंपादन, पुनर्वसन किंवा पुनर्स्थापनेसाठीचा मोबदला देण्यात विलंब झाला, तर भूधारकांना त्यावरच्या व्याजाचा दर वाढवून देण्याचा निर्णय आज राज्यमंत्रिमंडळाने घेतला. हा दर रेपो दरापेक्षा एक टक्के जास्त असेल. राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. राज्यात नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांसाठी जमीनखरेदीच्या व्यवहारांवर हस्तांतरण शुल्कात २५ टक्के सवलत देण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. मात्र संबंधित जमिनीचा वापर अन्य कारणांसाठी केला गेल्यास हस्तांतरण शुल्काची रक्कम व्याजासह वसून करण्यात येणार आहे. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पासाठी स्थापन झालेल्या कंपन्यांमधे अंतर्गत जमीन हस्तांतरण झाल्यास त्या व्यवहारावर मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

बँका एकीकडे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित यंत्रणा तयार करत असताना त्यांच्यावर अर्थपूर्ण मानवी देखरेख असायला हवी, असं मत रिझर्व्ह बँकेचे

गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आज नोंदवलं. मुंबईत एका कार्यक्रमात ते बोलत होते. एखाद्या चुकीसाठी तंत्रज्ञानाला जबाबदार ठरवणं रिझर्व्ह बँकेला स्वीकारार्ह नाही, असंही ते म्हणाले. बँका ग्राहकांना देत असलेली सेवा सुधारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा, मानवी क्षमतांची जागा घेण्यासाठी नाही, असं त्यांनी बँकांना सुचवलं.

<><><><><>

पुढच्या आर्थिक वर्षात भारताचा जीडीपी वाढीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज फिच रेटींग या जागतिक मानांकन संस्थेनं व्यक्त केला आहे. ऊर्जा पुरवठ्यावर संकट आलं तरीही भारताची अर्थव्यवस्था मजबूत आणि स्थिर राहील असं संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. गेल्या सलग ३ वर्षांच्या तुलनेत हा दर कमी  असला तरी तो भारताला मिळालेल्या बीबीबी मानांकन वर्गातल्या इतर अर्थव्यवस्थांच्या सरासरी दराच्या  तिप्पट आहे.

<><><><><>

वैद्यकीय प्रवेशासाठी नीट परीक्षा रद्द करायचा प्रस्ताव तमिळनाडू विधानसभेनं आज एकमतानं संमत केला. राज्याचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉक्टर अरुणराज यांनी हा प्रस्ताव मांडला. नीट परीक्षा यंत्रणा रद्द करून १२वीतल्या गुणांच्या आधारे मेडिकलला प्रवेश द्यावा, असं ते म्हणाले.

<><><><><>

झारखंड सरकारनं आंदोलकांच्या बहुतांश मागण्या मान्य केल्या आहेत. भरती परीक्षा पद्धतीत अणखी सुधारणा करण्याची सरकारची तयारी असल्याचं झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन म्हणाले. भाजपा या आंदोलकांची दिशाभूल करत असल्याचा आरोप त्यांनी आज केला.

<><><><><>

अमेरिकेची अंतराळ संस्था नासा ने त्यांच्या मून बेस कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेला आमंत्रित केलं आहे. दोन्ही देशांमध्ये झालेल्या आर्टेमिस करारांतर्गत नासा ने हे आमंत्रण दिल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे. भारत- अमेरिका नागरी अंतराळ संयुक्त कृतिदलाची नववी बैठक ५ आणि ६ ऑगस्ट ला इसरोच्या बंगळुरू इथल्या मुख्यालयात पार पडली. त्यासाठी अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जिओ गोर उपस्थित होते.

**<><><><><>**

पश्चिम कोलंबियातली १०-१२ शहरं आणि गावांमध्ये काल झालेल्या तीव्रतेच्या भूकंपामुळे पावणे दोनशेपेक्षा जास्त लोक दगावले, तर ३ हजाराहून अधिक लोक बेपत्ता झाले असून, अनेकजण ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. तिथं आज पुन्हा शोध आणि बचाव कार्य पुन्हा सुरू झालं आहे. काली, परेरा, चोको आणि मनिझालेस इथल्या महापौर आणि गव्हर्नरांनी दिलेल्या माहितीनुसार या भागांमधे किमान १७९ लोकांचा मृत्यू झाला आहे. सुमारे १ हजार ६०० इमारतींचं नुकसान झाल्याचं किंवा त्या कोसळल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

सीरियाचे माजी अध्यक्ष बशर असद आणि त्यांचा भाऊ महेर असद यांना त्यांच्या सीरियातल्या फौजदारी न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. सिरीयात १४ वर्ष सुरु राहिलेल्या संघर्षाच्या काळात सत्तेचा दुरुपयोग करून मानवतेविरोधात अनेक गुन्हे केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवला गेला आहे. सिरीयात ५० वर्षे सत्तेमध्ये असलेल्या असद यांची सत्ता दीड वर्षांपूर्वी संपुष्टात आल्यानंतर त्यांच्याविरोधात प्रथमच असा निकाल दिला गेला आहे. असद आणि त्यांचे निकटवर्तीय सध्या रशियात असून त्यांना सिरीयात परत पाठवण्याची मागणी सीरियाच्या नवीन सरकारने केली आहे.

**<><><><><><>**

दक्षिण आफ्रिकेतल्या रुस्टेनबर्ग शहराजवळ एका बंद पडलेल्या खाणीत किमान १४ कामगारांचा मृत्यू झाल्याचं उघडकीस आलं आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असून अनेकजण जखमी झाले आहेत. दक्षिण आफ्रिकेत बंद पडलेल्या सोने आणि प्लॅटिनम खाणी बेकायदेशीरपणे चालवल्या जातात आणि तिथं हजारो कामगार काम करतात.

**//<><><><><><>//**